# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 06/03/2020 (शुक्रवार)
# (सायंकाळ)

## फसवणुक

पो.स्टे. रामटेक :- अंतर्गत 8 कि मी अंतरावर मौजा नवरगाव शिवार येथे दिनांक 26/02/2020 चे 00.00 वा. ते दिनांक 05/03/2020 चे 13.37 वा. पर्यंत फिर्यादी सरतर्फे राजु पोले, वय 32 वर्ष, पो. स्टे रामटेक व आरोपी नामे- रामनकर क्रिष्णमोहन कोरपाटी, रा. भाग्यश्री हार्डवेअर च्या मागे, हनुमान मंदीर जवळ खरबी रोड आफरेज नगर, नागपुर यांनी सन 2014 मध्ये भागेदारी मध्ये मौजा नवरगाव येथील शेत सर्व क 163/1ए,161ए जमिन खरेदी केलेली असुन सदर शेतीची दि. 26/2/16 रोजी आरोपीने फिर्यादीचा विश्वासघात करुन फिर्यादीचे खोटया सहया करुन बनावट कागदपत्रे तयार करुन फसवणुक केली आहे. तसेच बनावट दस्त खरा म्हणुन वापरुन फिर्यादीची व त्याची मुलगी कु. पुजा जैन हिचे नावे असलेली सर्वी क 163/1बी ही शेतजमीनीची विक्री करुन त्यावर प्लाट पाडुन ती विकलेली आहे. फिर्यादीने दिलेल्या तक्रारी वरुन मा प्रथमवर्ग न्यायदंडधिकारी, प्रथमवर्ग न्यायालय रामटेक कु. व्हि.पी.धुर्व मॅडम यांचे आदेशाने क सीआरआय.एम ए. नंबर ऑफ 2020 अन्वेय सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम 406, 418, 419, 420, 426, 447, 465, 457, 469, 471 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सोनवने 9673526177 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कुही :- अंतर्गत 20 कि.मी. अंतरावरील मौजा उंद्री येथे दिनांक 04/03/2020 चे 17:00 वा. योगेन्द्र विष्णु यादव, वय 25 वर्ष, रा.ग्राम बडहरामा पो मुजडीहा ता.कुशीनगर उत्तरप्रदेश हा अंघोळी करीता बंद असलेल्या खंदानी मध्ये गेला. योगेन्द्र यादव याला पोहता येत नसल्याने तो खदाणीच्या खोल पाण्यात बुडुण त्याचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे- श्याम बाबुनंदन यादव, वय 49 वर्ष, रा. कडु लेआउट नागराज नगर नारी रोड नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार दिलीप लांजेवार हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर